# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक

☎ : 2461479, Fax : 2455301 ई-मेल:-ronashik.dte@ gmail.com.

www.dtensk.org


---

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

**जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/** 1253 **दिनांक :-** 10 JUL 2010

**प्रति,**

प्राचार्य/संचालक,
विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या अभियांत्रिकी/फार्मसी/एचएमसीटी
आर्किटेक्चर,एमबीए/एमसीए अभ्यासक्रमाच्या
पदविका,पदवी,व पदव्युत्तर पदवी संस्था,
नाशिक विभाग.

**विषय** :-शैक्षणिक वर्ष २००८-२००९ व २००९-२०१० मध्ये वाटप करण्यात आलेल्या ईबीसी रक्कमामधील शिक्षणशुल्काच्या रक्कमेव्यतिरिक्त रक्कमेच्या वसुलीबाबत.

**संदर्भ**:-१.संचालनालयाचे पत्र क्रं.१५/अर्थसं/ईबीसी सवलत/२०१०-११/१८३ दिं.२८.५.२०१०.
२.संचालनालयाचे पत्र क्रं.१५/अर्थसं/ईबीसी सवलत/२०१०-११/१८८ दिं.४.६.२०१०.
३.संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रं. १५ /अर्थसं /आमावि-लेखापरिक्षण २०१०-११ /२०८ दिं.२३.६.२०१०.

उपरोक्त विषयास अनुसरुन आर्थिकदृष्या मागासवर्गीय विदयार्थ्याच्या (ईबीसी) सवलती बाबत शिक्षणशुल्का (Tution fee) च्या ५० टक्के प्रतिपूर्तीची तरतूद आहे.शैक्षणिक वर्ष २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षाचे ईबीसी सवलतीचे विदयार्थ्याचे प्रस्ताव हे **फक्त शिक्षणशुल्क(Tution fee)** रक्कमेच्या ५० टक्के या प्रमाणे सादर करावयाचे असे ईबीसीच्या सदर कालावधीच्या शासननिर्णयामध्ये व या कार्यालयाने आपल्या संस्थेस प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेल्या पत्रातही नमूद केलेले होते.तरीही ब-याचशा संस्थानी सदर आदेशाचे पालन न करता शिक्षणशुल्काच्या रक्कमेव्यतिरिक्त इतर शुल्काचा जसे **Development fee** इ.चा समावेश करुन प्रस्ताव सादर केले व त्याप्रमाणे या कार्यालयाकडूनही सदर प्रस्तावानुसार प्रतिपूर्तीच्या रक्कमेचे धनादेश द्वारे या कार्यालयाकडुन संस्थाना वितरण करण्यात आले. संचालनालयाचे संदर्भिय क्रं.१ व २ च्या पत्राच्या अनुषंगाने तसेच संदर्भीय क्रं.३ च्या कार्यालयीन आदेशान्वये संचालनायामार्फत या विभागीय कार्यालयात शैक्षणिक वर्ष २००६-०७ ते २००९-१० मध्ये आर्थिकदृष्या मागासवर्गीय विदयार्थ्याच्या ईबीसी

सवलती बाबतच्या प्रस्तावाचे लेखापरिक्षण करण्यासाठी संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे पथक आले असता सदर बाब त्यांचेही निदर्शनास आल्यामुळे सदर **शैक्षणिक वर्ष २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षाची सर्व संबधित संस्थानी सदर कालावधीची विदयार्थ्याकडून शिक्षणशुल्काच्या(Tution fee) रक्कमेव्यतिरिक्त इतर शुल्क जसे Development fee इ. ची रक्कम वितरीत केलेली असेल ती वसुल करण्यात येवून सदर रक्कम विदयार्थ्याच्या नावाची यादी व वसुल केलेली रक्कम याप्रमाणे एकत्रित डी.डी. JOINT DIRECTOR TECHNICAL EDUCATION REGIONAL OFFICE,NASHIK ROAD या नावाने काढून तात्काळ या कार्यालयास जमा करण्यात यावा. तसेच काही संस्थाचे शुल्क कमी झालेले असल्यास जास्त शुल्कानुसार सादर केलेले ईबीसीच्या प्रस्तावातील फरकाची रक्कम,तसेच अल्पसंख्याक विदयार्थ्याना मॉयनॉरटी स्कॉलरशिप मिळालेली असल्यास व त्यांनी ईबीसीची सवलत घेतलेली असल्यास तसेच फी-व्हेवर स्कीममधील विदयार्थ्याना ईबीसी सवलत दिलेली असल्यास अशा सर्व विदयार्थ्याकडूनही रक्कमेची वसुली करुन ती रक्कम JOINT DIRECTOR TECHNICAL EDUCATION REGIONAL OFFICE,NASHIK ROAD यांचे नावे डी.डी.काढून या कार्यालयास तात्काळ सादर करावी.**

**सदर वसुलीचे डी.डी. या कार्यालयास तात्काळ सादर केले नाही तर सन २०१०-११ या वर्षाचे ईबीसीचे प्रस्ताव या कार्यालयामार्फत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी**

तसेच यापुढे ईबीसीचे प्रस्ताव सादर करतांना त्यामध्ये फक्त **शिक्षणशुल्काच्या (Tution fee)** रक्कमेनुसारच प्रस्ताव तयार करण्यात यावे. तसेच शैक्षणिक वर्ष २००८-२००९ व २००९-२०१० मध्ये वितरीत करण्यात आलेल्या रक्कमाचे लाभार्थी विदयार्थ्याचे एकत्रित रेव्हेवु स्टॅम्प लावलेले सहयाचे प्रमाणपत्र व प्राचार्याचे उपयोगिता प्रमाणपत्रही तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावे .

**(डॉ.आर.एस.नायडू)**
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.

**प्रत:-** मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई कार्यासन कं.१५ यांना माहितीस्तव सादर.